# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०९/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## इलेक्ट्रीक मोटार मशिनी चोरी करणारे आरोपी उमरेड पोलीसांच्या जाळयात

दिनांक १२/०९/२०२४ चे ०५/३० वा. दरम्यान ते दि. १३/०९/२०२४ चे ०९/१५ वा. दरम्यान पोस्टे उमरेड अंतर्गत मौजा एमआयडीसी वैभव लक्ष्मी रोलींग मिल येथे कुकर बनविण्याच्या मशिनीला लागलेल्या अमरीत सुपर पॉवरची ०३ मोटार क्र. १) ०५ एच पी किं. ६०००/— रू २) २ एचपी ची कि. २०००रू ३) २ एचपी ची कि. २००० रू ४) कलसी कंपनीची ३ एचपी किंमती ४०००/—रू च्या इलेक्ट्रीक मोटार मशीनी एकुण १४०००/—रू. च्या कोणत्यातरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली आहे. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे कलम ३३४(१), ३०५(अ) बिएनएस अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोस्टे उमरेड येथील तपास पथक आरोपीचा शोध घेत असताना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, काही इसम मोटरसायकलवर एमआयडीसी परीसरात संशयीतरीत्या फिरत आहे. अशा माहिती वरून एमआयडीसी परीसरात काही इसम बंद दुध डेअरी समोर मोटरसायकलवर दिसुन आले. त्यांना विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तरे देत होते. म्हणुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांना नाव गाव विचारले असता **आरोपी नामे— ०१) अमोल नरेश डडमल वय २६ वर्ष, ०२) अक्षय किसन डडमल, वय २३ वर्ष, ०३) विनोद नामदेव डडमल वय ३४ वर्ष, ०४) योगेश गुलाब डडमल वय २६ वर्ष, ०५) विशाल दिलीप वाकडे, वय २९ वर्ष, सर्व रा. कुंभारी ता. उमरेड जि. नागपुर** असे सांगितले. त्यांच्या ताब्यातून चोरी गेलेल्या कलसी कंपनीची ३ एच पी एक मोटार व अमरीन कंपनीची ०२ एच पी च्या ०२ मोटार व ०५ एचपी ची ०१ मोटार अशा एकुण ०४ मोटारी किंमती १४,०००/—रू. व आरोपीच्या ताब्यातील होंडा ॲक्टीवा ६ जी क्र. एम एच—४०/सि व्ही ६६५३ किंमती १०००००/—रू. २) पॅशन प्रो कंपनीची काळया रंगाची क्र. एम एच—४०/एक्स—९२७५ किंमती ४०,०००/—रू. ३) पल्सर एन एक्स १६० क्र. एमएच—४०/सि पी —९७५२ किंमती १,३०,०००/—रू. असा एकुण २८४०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि अनिल राउत, सपोनि भाग्यश्री कुलकर्णी, पोहवा प्रदीप चवरे, रमेश खरकाटे, भागवत गुट्टे, संदीप गुट्टे, पोहवा राधेशाम कांबळे, पोहवा विष्णु जायभाय, पोअं गुड्डु सोनवाने, प्रफुल क्षिरसागर, उमेश बांते यांनी पार पाडली.

## मौजा उमठा पारधी बेडा येथील हातभट्‌टी चालकांवर पोलीसांची रेड कारवाई
## जलालखेडा पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची
## संयुक्त प्रतिबंधक कारवाई

दि. १४/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीतील मौजा उमठा, पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्याने पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील मौजा उमठा, पारधी बेडा येथे सुरू असलेल्या मोहाफुल गावठी दारू भट्‌टीवर रेड केली असता ०३ महिला व ०१ पुरूष **आरोपी नामे— राजेंद्र जनार्दन पवार, वय ४९ वर्ष, रा. उमठा पारधी बेडा** यांचे ताब्यातून एकुण १) प्लॅस्टिक डबकित एकूण १३० लिटर मोहाफुल गावठी दारू एकूण किंमती ६५००/—रू. २) २००० लिटर मोहफुल सडवा रसायन एकूण किंमती ४००००/—रू. व इतर दारू गाळण्याचे साहित्य किंमती ८०००/—रू., असा एकुण ५४५००/—रू. चा मुद्‌देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे जलालखेडा यांचे ताब्यात देण्यात आले. ०४ आरोपीतांविरूद्ध कलम ६५(ई), (एफ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी मनोज गदादे, सपोनी आशिष ठाकूर, सफौ मिलिंद नांदुरकर, पोहवा दिनेश अधापुरे, पोहवा ईकबाल शेख, पोहवा रोशन काळे, पोहवा संजय बरोदीया, पोहवा प्रमोद भोयर, पोना वीरेंद्र नरड, मपोहवा नितु रामटेके, मपोहवा कविता बचले, पोशी अभिषेक देशमुख, पोशी धोंडुतात्या देवकते, चापोहवा अमोल कुथे, चापोहवा मुकेश शुक्ला, चापोशी शेषराव यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**